मासिक

# सन्मार्गमित्र

दर महिन्याच्या २५ तारखेला

प्रसिद्ध होणारे संस्थेचे मुखपत्र

वार्षिक वर्गणी

रुपये १००/-



## अखिल ब्राह्मण

## मध्यवर्ती संस्था, नाशिक

जलशुद्धीकरण केंद्राशेजारी, हॉटेल सिबलजवळ,

त्र्यंबकरोड, नाशिक : ४२२००२.

फोन : ०२५३-२३१३५९९

website : admsanstha.org

email : admnsk@gmail.com

sanmargmitra2018@gmail.com



**संपादक**

सुभाष सबनीस

**प्रकाशक**

उदयकुमार मुंगी

**संपादन सहाय्य**


अजित चिपळूणकर, ॲड. समीर जोशी

प्रा. लक्ष्मीकांत भट, सौ. अश्विनी पेशकार

सन्मार्गमार्ग हे मासिक मालक अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था यांच्यासाठी प्रकाशक उदयकुमार दत्तात्रय मुंगी यांनी रिप्लिका प्रिंटर्स, २, चिटको सेंटर, वकीलवाडी, नाशिक येथे छापून अखिल ब्राह्मण मध्यवर्ती जलशुद्धीकरण केंद्राजवळ, त्र्यंबकरोड, नाशिक : ४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

*(या अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक आणि अ.ब्रा. म. सहमत असेलच असे नाही.)*


## दिगंबरा दिगंबरा
## श्रीपाद वल्लभ दिगंबर



## दत्त जयंतीनिमित्त
## हार्दिक शुभेच्छा!

## अखिल ब्राह्मण
## मध्यवर्ती संस्था, नाशिक

सर्व कार्यकारिणी सदस्य व सभासद

## संपादकीय

# अनिश्चितता


नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत निवडून आलेल्या सर्व सदस्यांचे अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन.

महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका होवून एक महिना झाला आहे. तरीही राज्यात लोकनियुक्त सरकार स्थापन होवू शकत नाही हे महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय क्लेशकारक अशी घटना आहे. लवकरच महाराष्ट्राला लोकनियुक्त मुख्यमंत्री मिळावा अशी सर्व मराठी माणसांची अपेक्षा आहे.

आर्थिक मंदीचे सावट, काही भागात असलेला दुष्काळ, अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली परिस्थिती, शेतकरी आणि कामगार वर्गात असलेली असंतोषाची भावना यामुळे सगळीकडे अनिश्चितता पाहायला मिळत आहे.

हे सर्व घडत असताना आयोध्या निकालाने सर्व भारतवासीयांना एक दिलासा मिळालेला आहे. लवकरच प्रभुरामचंद्र आपल्या जन्मभूमीत विराजमान व्हावेत, असेच सर्वांना वाटत आहे. यामुळे एक निश्चित आहे की, रामजन्मभूमी वादामुळे अनेक वर्षे चाललेला राजकीय संघर्ष संपुष्टात आलेला आहे.

महाराष्ट्रातील राजकीय अस्थिरता संपवण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येवून यातून मार्ग काढला पाहिजे. कारण महाराष्ट्राने कोणत्याही एका पक्षाला संपूर्ण बहुमत दिलेले नाही. युती आणि आघाडी यामुळे निर्माण



झालेला पेच युती आणि आघाडीच्या सर्व पक्ष्यांनी एकत्र यावे आणि आपापले पक्षीय भेदभाव, पक्षीय विचारधारा बाजूला ठेवून महाराष्ट्राच्या हितासाठी निर्णय घ्यावा असेच सर्व मराठी माणसांना वाटत आहे. विरोधक असले तरी ते निवडणुकीपुरतेच असावेत, निवडणुका झाल्यावर ‘हम सब एक’ हा नारा द्यावा. कारण आज जी परिस्थिती निर्माण झाली आहे ती दोन पक्षातील स्वाभिमान आणि मीच मोठा या भावना वाढीला लागल्यामुळे झाली आहे, हे लक्षात घेणे येथे महत्वाचे आहे. निवडून आलेला प्रतिनिधी हा एका पक्षाचा न रहाता त्याच्या–त्याच्या मतदार संघासाठी तो सगळ्याचा असतो. तसेच सर्व आमदार हे त्या–त्या पक्षाचे नसून सर्व महाराष्ट्राचे आहेत, ही भावना निर्माण होईल. लवकरच महाराष्ट्राला नवीन मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ पाहायला मिळेल हीच अपेक्षा.

**–सुभाष सबनीस**



## महाराष्ट्र विधानसभा : २०१९

# नवनिर्वाचित आमदारांचे मन:पूर्वक अभिनंदन!

## अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक



**प्रा. देवयानी फरांदे**
नाशिक मध्य



**सीमा हिरे**
नाशिक पश्चिम




**ॲड. राहुल ढिकले**
नाशिक पूर्व



**सौ. सरोज अहिरे**
देवळाली



**ॲड. माणिकराव कोकाटे**
सिन्नर



**दिलीप बनकर**
निफाड



**नितीन पवार**
कळवण




**नरहरी झिरवाळ**
पेठ–दिंडोरी



**हिरामण खोसकर**
त्र्यंबक–इगतपुरी



**सुहास कांदे**
नांदगाव



**छगन भुजबळ**
येवला




**मौलाना मुफ्ती**
मालेगाव मध्य



**दादा भुसे**
मालेगाव बाह्य



**डॉ. राहुल आहेर**
देवळा–चांदवड




**बोरसे**
बागलाण

# श्री दत्त विशेष : महत्त्वपूर्ण दत्तस्थाने

**श्री दत्त विशेष : महत्त्वपूर्ण दत्तस्थाने**

दत्तात्रेयांचा दुसरा अवतार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नृसिंहसरस्वती यांनी आपल्या तीर्थाटनात अनेक ठिकाणी वास्तव्य करून तपाचरण केलं. अशा ठिकांणांना दत्त माहात्म्याचे अधिष्ठान लाभले आणि आज ही स्थानं दत्त क्षेत्रं म्हणून ओळखली जातात. त्यापैकी औदुंबर, नृसिंहवाडी, गाणगापूर या तीन महत्त्वाची स्थाने आहेत. तसेच दत्तावतारी सिद्धपुरुष म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्वामी समर्थाचे स्थान असणारे अक्कलकोटदेखील दत्तभक्तांमध्ये प्रसिद्ध आहे.





**कृष्णाकाठचे औदुंबर**


नृसिंहसरस्वती आपल्या तीर्थाटनादरम्यान नृसिंहवाडीच्या आधी औदुंबर क्षेत्री राहिले होते. १४२१ सालच्या चातुर्मासात त्यांचा निवास कृष्णातीरावरील या मनोहारी वनात होता. याच ठिकाणी त्यांनी औदुंबर वृक्षाचा महिमा सांगितला. औदुंबर वृक्षात माझा नित्य वास राहील, असं त्यांनी सांगितलं. तीर्थाटनादरम्यानचं चातुर्मास्य अनुष्ठान नृसिंहसरस्वतींनी याच ठिकाणी केलं आणि त्यांच्या वास्तव्याने पुनीत झालेलं हे औदुंबराचं वन आज दत्त क्षेत्र औदुंबर म्हणून प्रसिद्ध आहे. गुरुचरित्राच्या १७ व्या अध्यायात येथील वास्तव्यादरम्यानच्या नृसिंहसरस्वतीच्या कार्याचं वर्णन केलं आहे.

कृष्णेच्या ऐलतीरावर भिलवडीजवळ भुवनेश्वरीचं प्राचीन शक्तिपीठ आहे. येथे तपस्वी जनांची वस्ती नेहमीच असे. वृक्षांच्या गर्दीमुळे अनुष्ठानासाठीचा पवित्र असा एकांत आपोआपच तयार झाला होता. त्याला जोड मिळाली पैलतीरावरील नृसिंहसरस्वतींच्या पुनीत वास्तव्याची. त्यांनी औदुंबरच्या महिमा विशद करून या स्थानाचं महत्त्व अधोरेखित केलं आणि दत्तप्रभूंच्या क्षेत्रात औदुंबराचं महत्त्व वाढलं. १९०४ साली ब्रह्मानंदस्वामी हे गिरनार पर्वती असणारे सत्पुरुष येथे आले आणि त्यांनी हे क्षेत्र प्रकाशात आणलं. कृष्णातीरावरील विस्तीर्ण घाट आणि औदुंबराचं वन यामुळे हे क्षेत्र साधनेसाठी प्रसिद्ध होत गेलं.

सांगली या जिल्ह्याच्या ठिकाणापासून केवळ ३० किलोमीटरवर असणाऱ्या या क्षेत्री जाण्यासाठी नियमित

सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे. तर पुणे, कोल्हापूर रेल्वे मार्गावरील भिलवडी स्थानकापासून सात किलोमीटरवर औदुंबर आहे.

भारतीय संस्कृतीकोशानुसार औदुंबरचा आणखीन एक संदर्भदेखील सापडतो. पंजाबातील बियास, सतलुज व रावी यांच्यामधील प्रदेशातील जनपद असणारे हे लोक होते. स्वत:ला ते विश्वामित्राचे वंशज म्हणवतात. तिथे सापडलेल्या नाण्यांवर विश्वामित्राचं चित्र आढळून आलं आहे. त्या औदुंबराचं राज्य प्रजासत्ताक असावं असा उल्लेख आहे.



**नृसिंहवाडी : दत्तप्रभूंची राजधानी**

दत्तप्रभूंचे दुसरे अवतार म्हणून ज्यांना ओळखले जाते अशा नृसिंहसरस्वतींच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या क्षेत्राला दत्तभक्तांमध्ये दत्तप्रभूंची राजधानी म्हणून स्थान आहे. वासुदेवानंद सरस्वती ऊर्फ टेंबे स्वामींनी भारतभ्रमण केल्यानंतर येथे वास्तव्य केलं आणि नृसिंहवाडीला दत्तप्रभूंची राजधानी, असे संबोधले आहे. १३७८ मध्ये कारंजा येथे नृसिंहसरस्वतींचा जन्म झाला. १३८८ मध्ये त्यांनी संन्यास दीक्षा घेतल्यानंतर ते तीर्थाटनास निघाले. त्यादरम्यान १४२१ साली त्यांचा मुक्काम औंदुबरी क्षेत्री होता, तर १४२२ मध्ये कृष्णा पंचगंगा संगमानजीकच्या गावात होता. नृसिंहसरस्वतींनी येथे तब्बल बारा वर्षे तपश्चर्या केली.

या पवित्र संगमस्थळी तपसाधना केल्यानंतर १४३४ मध्ये त्यांनी येथे औदुंबर वृक्षातळी मनोहर पादुका आणि अन्नपूर्णा जान्हवीची स्थापना केली आणि आपण येथे वास करू अशी ग्वाही भक्तजनांना दिली व गाणगापुरी प्रस्थान ठेवले.

नृसिंहसरस्वतींच्या पावन वास्तव्यामुळेच या क्षेत्राला नृसिंहवाटिका म्हणून ओळखले जाऊ लागले. हीच आजची नृसिंहवाडी अथवा नरसोबाची वाडी होय. कृष्णा पंचगंगेच्या नयनरम्य तीरावर वसलेलं हे तीर्थस्थळ आज दत्तभक्तांसाठी दत्तप्रभूंची राजधानी म्हणून ओळखलं जातं. नृसिंहसरस्वती यांच्यानंतर अनेक महान विभूतींनी येथे वास्तव्य केलं आहे. साधना, उपासना भक्ती यासाठी अनुकूल अशा या स्थानी तीन त्रिकाळ दत्तभक्तीचा जागर सुरू असतो. नदीतीरामुळे परिसरास लाभलेली समृद्धता, वातावरणातील भरून राहिलेला भक्तिभाव, गुरुचरित्रात उल्लेख असणारे पैलतीरावरील अमरेश्वर, कृष्णेचं विस्तीर्ण पात्र अशा या दत्तभक्तीच्या रम्य तीर्थक्षेत्री दत्तभक्तांचा अष्टोप्रहर राबता असतो.

पहाटे तीनपासून ते रात्रौ दहा वाजेपर्यंत दत्तभक्तीचा जागर येथे सुरू असतो. काकड आरती, पंचामृत अभिषेक, महापूजा, पवमान पठन, धूपदीप आरती, दत्तगजरात होणारा पालखी सोहळा आणि शेजारती असा नित्यक्रम अत्यंत श्रद्धेने आणि उत्साहाने आजही सांभाळला जात आहे. दत्तांची विविध कवने आणि पदांचा उच्चरवात होणारा हा जागर आणि रोजचा पालखी सोहळा खास अनुभवण्यासारखा असतो. वर्षभरातील विविध उत्सव, नृसिंहजयंती, रामनवमी व इतर सनकादीक पुण्यतिथ्या व सण नियमित साजरे केले जातात.

नदीकिनारीच मंदिर असल्यामुळे महापुराचे पाणी पादुकांना स्पर्श करते, तेव्हा त्या प्रचंड वेगवान पाण्याच्या प्रवाहात दक्षिणद्वाराचं पुण्य घेण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने येतात. मंदिरात पाणी शिरले तरी पुराच्या पाण्यातून जात सारे नित्य सोपस्कार पार पाडले जातात. पादुकांपर्यंत पाणी आल्यावर मात्र उत्सव मूर्ती टप्प्याटप्प्याने हलवली जाते. अर्थात दरवर्षीच्या या नित्य कार्यक्रमाचं पालन येथे काटेकोरपणे होतं.

साधारण पंधरा-वीस वर्षांपूर्वी नृसिंहवाडीचा विस्तार तुलनेनं मर्यादित होता. गर्दीदेखील मर्यादित होती. विस्तारासाठी नैसर्गिक मर्यादा असल्या तरी आज खूप मोठ्या प्रमाणात धर्मशाळा, भक्तनिवास, प्रसादालय, वेद उपासनेच्या सुविधा यामुळे क्षेत्र बाराही महिने गजबजलेले

असते. नदीकिनारी बांधलेल्या विस्तीर्ण घाटामुळे मंदिर परिसर भव्य झाला आहे. २००५ च्या महापुरात जवळपास संपूर्ण गावालाच पाण्यानं वेढलं होतं.

वाडीतील दत्त मंदिराबाबत सांगितली जाणारी माहिती मात्र आश्चर्यकारक अशीच आहे. जरी हे हिंदूंचं स्थान असलं तरी विजापूरच्या आदिलशाहने आपल्या मुलीची दृष्टी परत यावी म्हणून प्रार्थना केली होती. त्याला सकारात्मक फळ आल्यामुळे आदिलशहाने मंदिराचे बांधकाम करून दिले. त्यामुळे त्याला कळस नाही.

या क्षेत्री पोहोचण्यासाठी सांगली २२ किलोमीटरवर आहे. तर नजीकचे रेल्वे स्टेशन मिरज हे १५ किलोमीटरवर आहे. तर कोकणातून, कर्नाटकातून येताना कोल्हापूरहून जयसिंगपूर अथवा इचलकरंजीमार्गे येता येते. नृसिंहवाडीच्या नजीकच दोन किलोमीटरवर असणारे कुरुंदवाड संस्थानकालीन ठाणं आहे.

कृष्णा पंचगंगेच्या संगमानंतर कर्नाटकच्या दिशेने जाणाऱ्या कृष्णेच्या तीरावरील संस्थानिकांनी बांधलेला घाट व विष्णू मंदिर पाहण्यासारखं आहे. तर आवर्जून पाहावं असं इतिहासकालीन कोपेश्वराचं मंदिर असणारं खिद्रापूर २५ किलोमीटरवर आहे.



**गाणगापूर**

दत्तभक्तीचा प्रसार दक्षिण भारतात अनेक ठिकाणी झाला. महाराष्ट्राच्या सीमेजवळील कर्नाटकातील गाणगापूर हे क्षेत्र हे त्यापैकीच एक. नृसिंहसरस्वतींनी येथे तब्बल २३ वर्षे असं दीर्घकाळ वास्तव्य केलं आहे. नृसिंहवाडीहून प्रस्थान ठेवल्यानंतर ते गाणगापूर क्षेत्री आले. भीमा आणि अमरजा या नद्यांच्या संगमावरील नृसिंहसरस्वतींच्या या दीर्घकालीन वास्तव्यामुळे या स्थानास दत्तभक्तांमध्ये फार महत्त्व प्राप्त झाले आहे. श्रीगुरुचरित्रात गाणगापूरचा उल्लेख गाणगापूर, गाणगाभवन, गंधर्वभवन आणि गंधर्वपूर या नावांनी येतो. नृसिंहसरस्वती सुरुवातीस संगमावरच राहत असत. नंतर गावातील मठात त्यांचा निवास होता. आज या मठातच त्यांच्या पादुका आहेत. येथील पादुकांना निर्गुण पादुका असं संबोधण्यात येते. हा मठ / मंदिर गावाच्या मध्यभागी आहे. पादुकांच्या गाभाऱ्याला द्वार नाही, चांदीने मढवलेल्या लहान झरोक्यातून पादुकांचे दर्शन घ्यावे लागते.

नृसिंहवाडीप्रमाणेच येथील नित्योपासना पहाटेपासून सुरू होतात. निगुर्ण पादुका चांदीच्या आवरणात ठेवलेल्या असून पूजेच्या वेळी अष्टगंध व केशराचा लेप दिला जातो. जलाभिषेक होत नाही. दर गुरुवारी पालखी असते. येथील नित्योपासनेत सर्वाधिक महत्त्व आहे ते दुपारच्या माधुकरी मागण्यास. येथे येणाऱ्या प्रत्येक यात्रेकरुने ही माधुकरी मागावी अशी प्रथा आहे. नृसिंह सरस्वतींनी येथून प्रस्थान ठेवण्यापूर्वी दिलेला संदेशाचा गुरुचरित्रातील उल्लेख ही यामागची भूमिका असल्याचं नमूद केलं जातं. दुपारच्या या माधुकरी मागण्यामध्ये नृसिंहसरस्वती अर्थात दत्तच कोणत्याही रूपात वावरत असतील हा ही माधुकरी मागण्यामागचा संदर्भ आहे. त्यामुळे दुपारच्या महानैवेद्यानंतर सेवेकरी, येथे निवासाला आलेले गांजलेले पीडित भक्तगण ही प्रथा नित्यनेमाने पाळताना दिसतात. माध्यान्याच्या समयी मी येथे वास करेन हेश्र२१नृसिंहसरस्वतींचे गुरुचरित्रातील निर्देश ही त्यामागची श्रद्धा. त्यामुळेच गाणगापूर क्षेत्री अनेक भक्तांचा राबता कायम असतो.

गावाजवळच मैलभर अंतरावरच्या संगमानजीक भस्माचा डोंगर आहे. प्राचीन काळी यज्ञभूमी असावी आणि अनेक यज्ञांतील राख एकत्र टाकल्यामुळे हा डोंगर तयार झाला असावा अशी आख्यायिका सांगितली जाते. गाणगापूर आणि संगम परिसरात सुमारे आठ तीर्थांची नोंद आहे. यात्रेकरूंमध्ये या तीर्थाच्या यात्रेचं महत्त्व खूप आहे. षट्कुल तीर्थ, नरसिंह (मनोहर) तीर्थ, भागीरथी तीर्थ, पापविनाशी तीर्थ, कोटितीर्थ, रुद्रपादतीर्थ, चक्रतीर्थ आणि मन्मथतीर्थ अशी ही आठ र्तीथ आहेत. गाणगापूर क्षेत्री उत्सवांमध्ये

दत्तजयंती आणि नृसिंहसरस्वती पुण्यतिथी हे दोन उत्सव महत्त्वाचे आहेत.

मुंबई –बेंगलोर लोहमार्गावर गाणगापूर रोड स्टेशनवरून २० किलोमीटरचे अंतर कापून गाणगापूर क्षेत्री जाता येते. तर सोलापूर, बीड, उस्मानाबाद, अक्कलकोट अशा ठिकाणांहून थेट बससेवा आहे. गुलबर्गा हे जिल्ह्याचे ठिकाण ३० किलोमीटरवर आहे.




**अक्कलकोट – दत्तावतारी सत्पुरुषांचे स्थान**

दत्तसंप्रदायाच्या अर्वाचीन इतिहासात अक्कलकोटचे आणि अक्कलकोट स्वामींचे स्थान महत्त्वाचे आहे. स्वामी समर्थ महाराज हे एक अवतारी सिद्धपुरुष म्हणून ओळखले जात. १८५७ मध्ये ते अक्कलकोट येथे वास्तव्यास आले आणि अखेपर्यंत तेथेच राहिले. उन्मुक्त लीला आणि चमत्कारांनी त्यांचे चरित्र भरले असल्याचा उल्लेख भारतीय संस्कृतीकोशात आहे. स्वामी समर्थाच्या पूर्वजन्माविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. ते फारसे त्याबद्दल बोलत नसत. त्यामुळे अक्कलकोटचे स्वामी महाराज अशीच त्यांची ख्याती पसरली. त्यांना एकदा कोणीतरी विचारले आपण कोठून आलात? तर त्यावर त्यांनी आम्ही कर्दळीवनातून आलो आणि विविध तीर्थक्षेत्रांच्या यात्रा करून येथे आलो असे सांगितले. १४५८ मध्ये कर्दळीवनात गेलेले नृसिंहसरस्वतीच स्वामींच्या रूपाने पुनश्च अवतरले असे दत्तभक्तांना वाटले आणि अक्कलकोटला दत्तस्थानाचे महत्त्व आले. एका उल्लेखानुसार कर्दळीवनातून बाहेर पडलेले स्वामी तीर्थाटन करत मंगळवेढ्यास १२ वर्षे राहिले आणि तेथून ते अक्कलकोटला आले.

सोलापूरनजीकच्या अक्कलकोटचे मूळ नाव प्रज्ञापुरी होते. या गावी स्वामी समर्थाचा सुमारे दोन तप निवास होता. त्यांनी महाराष्ट्र आणि कर्नाटकात दत्तोपासनेचा प्रसार मोठ्या प्रमाणात केला. त्यांची शिष्यपरंपरा मोठी आहे. गुरुसंप्रदाय त्यांनी मोठ्या प्रमाणात वाढविला. अक्कलकोटमध्ये स्वामींच्या वास्तव्याच्या खुणा अनेक ठिकाणी दिसून येतात. अक्कलकोटला स्वामी कायम वटवृक्षाखाली निवासास असायचे. त्याचबरोबर गावातील अनेक ठिकाणी महत्त्वपूर्ण दत्तस्थाने आहेत.

दत्तात्रेयांचा दुसरा अवतार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नृसिंहसरस्वती यांनी आपल्या तीर्थाटनात अनेक ठिकाणी वास्तव्य करून तपाचरण केलं. अशा अनेक ठिकाणांना दत्तमाहात्म्याचे अधिष्ठान लाभले आणि आज ही स्थानं दत्त क्षेत्रं म्हणून ओळखली जातात. त्यापैकी औदुंबर, नृसिंहवाडी, गाणगापूर या तीन महत्त्वाच्या स्थानांचा हा परिचय. तसेच दत्तावतारी सिद्धपुरुष म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्वामी समर्थाचे स्थान असणारे अक्कलकोटदेखील दत्तभक्तांमध्ये प्रसिद्ध आहे.

---

## श्री दत्त आरती

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा
त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा
नेति नेति शब्द न ये अनुमाना
सुरवर मुनिजन योगी समाधी न ये ध्याना ।।१।।

सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त
अभाग्यासी कैसी न कळे ही मात
पराही परतली तेथे कैचा हा हेत
जन्म मरणाचा पुरलासे अंत ।।२।।

दत्त येऊनिया उभा ठाकला
भावे साष्टांगेसी प्रणिपात केला
प्रसन्न होउनी आशीर्वाद दिधला
जन्ममरणाचा फेरा चुकविला ।।३।।

दत्त दत्त ऐसे लागले ध्यान
हरपले मन झाले उन्मन
मी तू पणाची झाली बोळवण
एका जनार्दनी श्रीदत्त ध्यान ।।४।।

# दीपावलीनिमित्त लक्ष्मीपूजन उत्साहात

**नाशिक :** दीपावली निमित्त संस्थेच्या मुख्य कार्यालयात संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. उदयकुमार मुंगी यांच्या शुभहस्ते श्रीलक्ष्मीचे पूजन करण्यात आले. नवनिर्वाचित कोषाध्यक्ष श्री सतीश बालटे यांनी यावेळी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यालयाला फुलांनी सजविण्यात आले होते. श्री.चंद्रशेखर गायधनी यांनी यावेळी पौरोहित्य केले. सर्व सभासदांना दिवाळीच्या शुभेच्छा देतांना कार्याध्यक्ष उदयकुमार मुंगी म्हणाले की, संस्थेच्या माध्यमातून आपण समाजासाठी जे काम करीत आहोत ते समाधान देणारे असले तरी आपण आपल्या समाजातील प्रत्येक घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेच्या माध्यमातून काय करता येईल याचा विचार करणे गरजेचे आहे, याच भावनेने आपण काम करीत राहू. सभासदांच्या सूचनांचे स्वागत आहे. तसेच जेष्ठ सभासदांनी मार्गदर्शन करावे जेणे करून आपल्या संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी हातभार लागेल. या प्रसंगी कार्यवाह अजित चिपळूणकर, सहकार्यवाह गंगाधर कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य विनोद कुलकर्णी, सुभाष सबनीस, नाशिक केंद्राचे सतीश करजगीकर जेष्ठ सभासद चंद्रात्रे काका उपस्थित होते.

**कुंकुमार्चन**

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था नाशिकच्या वतीने कुंकुमार्चन आयोजित करण्यात आले होते. सौ.गायत्री चीत्रगीमठ यावेळी स्त्रोत्र पठाण केले संस्थेच्या महिला सभासद तसेच उपस्थित महिलांनी यावेळी मोठ्या भक्तिभावाने सहभाग नोंदवून पुण्य पदरी पडावे म्हणून महालक्ष्मी, महासरस्वती यांची आराधना केली. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कार्याध्यक्ष उदयकुमार मुंगी, कार्यवाह अजित चिपळूणकर, सहकार्यवाह गंगाधर कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य श्री पांडुरंग सावजी, श्री उल्हास पंचाक्षरी, सौ.सुहासिनी बुरकुले यांनी विशेष प्रयत्न केले.यावेळी कोषाध्यक्ष ॲड.श्री व सौ.सतीश बाल्टे, पंचवटी केंद्र प्रमुख श्री व सौ. प्रदीप भानुवंशे, ॲड अविनाश भिडे, ॲड समीर जोशी, पंचवटी केंद्राचे चंद्रशेखर गायधनी, शेखर जोशी, संजय कुलकर्णी, सतीश करजगीकर, तसेच संस्थेचे कार्यकारिणी सदस्य सचिन पाडेकर, सुभाष सबनीस, हे उपस्थित होते. संस्थेच्या महिला सदस्य सौ म्हैसपुरकर, सौ.सुरेखा गायधनी, सौ. सुजाता करजगीकर,सौ. शरयू मुंगी, सौ. सुप्रिया सबनीस आदी उपस्थित होते.

# तुलसीविवाह दीपावली मिलन कार्यक्रम संपन्न

**नाशिक :** अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्याच्या वतीन दरवर्षी तुलसीविवाह व दीपावली मिलन कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतो. यावर्षी रविवार दिनांक १०/११/२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी नवनिर्वाचित केंद्रप्रमुख श्री सतीश करजगीकर व सौ सुजात करजगीकर हे या विवाह सोहळ्याचे यजमान होते. यावेळी संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री चंद्रशेखर गायधनी यांनी पौरोहित्य केले. यावेळी दिपोत्स्वाचेही आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक उपस्थिताने दीप लावून दिवाळीचा आनंद पुन्हा एकदा अनुभवला.

यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष उदयकुमार मुंगी सौ.शरयू मुंगी, श्री.व सौ. गंगाधर कुलकर्णी, श्री.व सौ.विनोद कुलकर्णी, श्री.व सौ. अनिल नांदुर्डीकर, श्री.व सौ. सतीश बालटे श्री.व सौ.उल्हास पंचाक्षरी,श्री.व सौ. निखील देशपांडे, सौ विजया म्हैसपुरकर, सौ.सुरेखा गायधनी, जयश्री कुलकर्णी, व मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. तुलसीविवाह व दिपोत्सावानंतर भोजनाचा कार्यक्रम होवून कार्यक्रम मोठ्या थाटात संपन्न झाला.

# सतीश करजगीकर यांची नाशिकचे केंद्रप्रमुख म्हणून बिनविरोध निवड

**नाशिक :** अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रात पसरलेला आहे. संस्थेच्या दैनंदिन कामकाजात सुसूत्रता यावी स्थानिक पातळीवर कार्यक्रमाचे नियोजन व्यवस्थित करता यावे यासाठी विविध शहरात संस्थेचे कार्यालये आहेत त्या कार्यालयाच्या प्रमुखाला केंद्रप्रमुख असे संबोधले जाते. नुकतीच संस्थेची निवडणूक बिनविरोध पार पडली आहे त्यानंतर सर्व केंद्रांनी सुध्दा आपल्या केंद्र पदाधिकाऱ्यांची पुनर्चना करावी असा संस्थेचा नियम आहे त्यानुसार संस्थेच्या नाशिक व पंचवटी केंद्रांची सुध्दा निवड प्रक्रिया पार पडली नाशिक केंद्राचे प्रमुख



म्हणून श्री सतीश करजगीकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून केंद्राच्या सभेत नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात येणार आहे. या निवडीबद्दल संस्थेच्या कार्यकारिणीच्या वतीने सतीश करजगीकर यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. या निवडीनंतर बोलताना सतीश करजगीकर यांनी सर्व नाशिककर सभासदांना आवाहन केले आहे की, केंद्राच्या नियमित होणाऱ्या कार्यक्रमामध्ये सहभागी व्हावे तसेच ज्या कोणाला केंद्राच्या उपक्रमात सक्रीय सहभाग घ्यावयाचा आहे त्यांनी संपर्क करावा. करजगीकर यांचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.

---

# संस्थेचा वर्धापन दिन आणि समाजगौरव पुरस्कार वितरण सोहळा

**नाशिक :** संस्थेचा ४७ सावा वर्धापन दिन सोहळा २४ डिसेंबर २०१९ व २५ डिसेंबर २०१९ या दिवशी साजरा करण्यात येणार आहे. संस्था सुवर्णमहोत्सवी वर्षाकडे वाटचाल करीत असताना यावर्षी होणारा वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे आयोजन करण्यात येत आहे. या निमिताने दोन दिवसांचे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात येत असून २४ तारखेला सकाळी संस्थेच्या प्रांगणात ध्वजारोहण करून या सोहळ्याची सुरवात होईल. त्यानंतर सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली आहे. स्वरवर्धन आयोजित संगीतमय गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दिनांक २५ डिसेंबर २०१९ रोजी संस्थेच्यावतीने दरवर्षी दिले जाणारे समाजगौरव पुरस्कारांचे वितरण होणार असून विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या समाजधुरीणांचा सन्मान करण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमाला सभासदांनी मोठ्या संखेने उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्यवाह व कार्यकारिणी सदस्यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# मुक्ताई

भागवत परंपरेत संत मंडळीत मुक्ताईचे स्थान अगदी असाधारण आहे. निवृत्तिनाथ, ज्ञाननाथ जरी तिचे भाऊ असले तरी ती त्यांच्या मोठेपणाच्या वारशांवर अजिबात जमलेली नाही. आपले स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवून आपली स्वतंत्र मुद्रा तिने उमटविली. अवघ्या १७।। वर्षाच्या आयुष्यात तीने तिचे जगणे आपल्यापर्यंत पोहोचवले. मुक्ताई–सारा आयुष्याचा पोतच और!

मुक्ताईचा जन्म अश्विनातल्या शुद्ध प्रतिप्रदेचा. नवरात्रातील पहिली माळ. प्रमाथी नाम संवत्सर शुक्रवारी मध्यान्हकाळी – शके १२०१ – समाधी काल शके १२१९ वैशाख वद्य दशमीला तापी तीरी. फक्त पावणे अठरावर्षे आयुष्य! स्वयंसिद्धा । तिचे आधीचे कित्येक जन्म ज्ञानसाधनेत आणि नामसाधनेत गेले असावेत आणि या जन्मात सगुणरुप असा देहरुपाने ही प्रगटली.

साऱ्या भावंडात सर्वात लहान असलेली ही मुक्ताई! पण तीच सर्वात मोठी असलेली! आई रूक्मिणीबाई आणि वडील विठ्ठलपतांनी आपला देह प्रयागक्षेत्री विसर्जन केला तेव्हा ती फारच लहान होती.

निवृत्ति, ज्ञानोबा आणि सोपानांनी शांत मनाने आईवडिलांच्या जाण्याचे दु:ख पचविले पण ही एवढीशी चिमुरडी! पहाटेच्या झोपेतूनच निवृत्तिदादाला प्रश्न विचारला, 'आई–बाबा कुठे आहेत. एवढा मोठा ब्रह्मसिद्ध– पण तो ही भांबावला आणि मुक्ते आता आपणच आईबाबा व्हायचे असं म्हणाला. या साऱ्या भावंडानी स्वत: सावरले आणि आता यांचे जीवन सुरू झाले.

छोट्या मुक्ताईच्या छोट्या तांबुससर हातात ज्ञानोबांनी केरसुणी पाहिली. त्यांचे डोळे पाण्याने भरले. ज्ञानोबा म्हणाले, 'मुक्ते.. आण मी झाडतो..' मुक्ता म्हणते, 'तू पाणी आण मी झाडते' अशा छोट्या छोट्या गोष्टीतून, क्रियेतून मुक्ताई वाढत गेली, घडत गेली.

लहान वयातच सार घर तिच्या अंगावर पडले. ती सारं आपलं मानून करीत होती. तिचा प्रत्येक शब्द सारेजण फुलासारखे झेलत होते आणि ती उंचच उंच होत होती.



जन्मजात समंजस होते सारेजण!

आळंदीत इंद्रायणी पलिकडे या साऱ्यांचे छोटीशी झोपडी– तीचे इंद्रायणींशी नेहमीच हितगुज चालायचे. भावंडाचे आणि तिचे एकमेकांवर अगदी अलोट सख्य होते. निवृत्ति–ज्ञानोबा–सोपाना तिला अगदी फुलासारखे जपत. रानात कधी कधी मुक्ताई गोवऱ्या वेचायला जायची. घरी येता येता दुपार व्हायची. उन्हाने चेहरा लालबुंद व्हायचा. लांबसडक केसांचा अंबाडा सैल व्हायचा. खणाचा परकर मळायचा. ज्ञानोबा धावत धावत तिच्या हातातली गोवऱ्यांची पाटी घ्यायचा. सोपाना तिला कडेवर घ्यायचा, निवृत्तिदादा गालगुच्चा घ्यायचा आणि ही घरात जायची. चूल पेटवायची. पांडुरंगाला नैवेद्य तयार व्हायचा. केळीच्या पानावर नैवेद्य वाढायचा. लगेच सोपाना ते पान उचलून पांडुरंगाला दाखवायचा–सगळी भावंडे मोठ्या प्रेमाने जेवायला बसायची.

असाच एक प्रसंग – खरंतर या मुलांचा काहीच दोष नव्हता. पण समाजाने त्यांना वाळीत टाकले. यांना त्याकाळी समाजाचा छळ मुकाट्याने सहन केला. त्यांना रहायला घर दिले नाही. त्यांना बाजार नाकारला. त्यांना देऊळ नाकारले पण त्यांना जेव्हा इंद्रायणी आणि पाणी नाकारले त्यावेळी मात्र ज्ञानोबांना सात्विक संताप आला. त्यांनी पाणी नाकारले आणि पाणी नाकारणे म्हणजे एकापरीने जीवन नाकारणे. निवृत्तिनाथ अभ्यासाला नाथाच्या गुंफेत गेले होते. सोपानही काही कामासाठी गेले होते. ज्ञानेदवांच्या मनात आले. बस झाले. एवढे जग जर आपल्याला त्रास देते तर जगायचेच कशाला? काय उपयोग या आपल्या जगण्याचा! त्यांना जगाचा अगदी वीट आला. या जगाचे तोंड बघायला नको. ज्ञानोबाराय रूसले आणि त्यांनी ताटीचे दार लावले. बांबूची आडवी तिडवी तयार केलेली ताटी.

मुक्ताई कोरान्न भिक्षा मागायला बाहेर गेली होती. भिक्षा घेऊन आली तो ताटी बंद! तिला वाटले. निवृत्तिदादा चिंतनाला बसला असेल. कारण त्यांना अशी सवय होती की चिंतनाला बसायच्या वेळी हळूच ताटी लावायची. कडी लावायची नाही. मग आज ताटीची कडी बंद कशी? मुक्ताईने हलेकच हाक मारली 'दादा मी आले' पण आतुन काहीच प्रतिसाद आला नाही. पुन्हा एकदा गोड हाक मारली. 'दादा अरे तुझी मुक्ता आलीय?' तरीही आतून काहीच प्रतिसाद नाही. 'कुणी आत आहे का?' मुक्ताई म्हणाली. 'हं' ज्ञानोबा म्हणाले. मी ज्ञाना आहे. 'अरे मग ताटी उघड ना?' निश्चयी स्वरात ज्ञानेदव म्हणाले, 'नाही'. मुक्ताई म्हणाली, 'का रे कंटाळा आला माझा?' 'नाही, जगाचा कंटाळा आलाय?' ज्ञानोबा उत्तरले. इतक्यात मुक्ताई म्हणाली, 'खरं तर यापूर्वीच यायला पाहिजे होता ज्ञानोबा. अरे जगाला कंटाळून कसे चालेल?' 'मुक्ताई जग सारखं सारखं तुच्छ मानतं'–ज्ञानोबा. 'अरे जगच ते! गच्छति इति जगत् । ते सारखे जातच अत्यत। त्याच जातं तोच इतरांना तुच्छ मानतो' मुक्ताई. 'यांच्यासाठी साधना काय फुकट घालवायची'–ज्ञानोबा. 'मला यांचा राग आलाय. मला अगदी नकोसं झालयं.' 'अरे असा खोट्या जगावर राग धरणं बरं नाही. बघ निवृत्ति दादा किती विशाल हृदयाचा आहे. त्यांच्या सहवासात आपण हेच शिकलो? सोपानाही साऱ्यांची बोलणी खात खात सारं करतो ना? आणि अरे तू तर साक्षात ज्ञानाचा अवतार! ज्ञानच कसलं तर जगाने जायचे कुणाकडे! या साऱ्या जगाला तुला अजुन बरंच काही सांगायचेय! त्यांना तुला काही नवं द्यायचय! आता हे जग तुझा तिरस्कार करतंय! तेच नंतर गळ्यात हारही घालेल. जग आणि मन या दोन्हीही वस्तू चंचल असतात. त्यांना फारसे मनावर घ्यायचे नसते. त्यांना त्याची जागा दाखविण्यासाठी आधी तडाखे घ्यायचे मग सारं आपोआप येते. ही तुझ्या सहनसिद्धिची प्रात्यक्षिक समज. तुझ्यातली प्रतिभा जागी कर.'

त्यावेळी मुक्ताईने ताटीचे अभंग सांगितले. ताटी हे निमित्त आहे. यात मुक्ताई जे बोलली. त्यात संतग्रंथाचे सार आले आहे. ते ताटीचे अभंग म्हणूनच प्रसिद्ध आहेत. ते आपल्या सर्वांना परिचित आहेत. त्यात खोल भावार्थ भरलेला आहे. मानवी जीवनाचा सूक्ष्म विचार त्यात आहे. मुक्ताई ज्ञानोबांची समजून काढते आहे. प्रसंग मोठा भावमय आहे. मोठ्याची समजूत काढताना लहानही मोठा होतो. समजूत काढायला वजन लागते. आत्मविश्वास असावा लागतो. सांगणाऱ्यापाशी तपस्या लागते. काही साधना लागते. मुक्ताई चित्कला होती. ती आदिशक्ती होती. ती आदिमाया होती. तिला समज आहे. घरातल्यांना कोणत्यावेळी काय लागणार याची तिला जाण होती. ती कधीतरी संसारात असायची पण ज्ञानाच्या आणि अभ्यासाच्या क्षेत्रात काय गरज आहे हे ओळखण्याची असामान्य शक्ती/जाणीव मुक्ताईपाशी होती.

**ज्ञानदेवांना ती सांगते –**

योगी पावन मनाचा । साहे अपराध जनाचा ।
विश्वरागे झाले वन्ही । संती सुखे व्हावे पाणी ।
शब्द शस्त्रे झाले क्लेश । संती मानावा उपदेश ।
विश्व पट ब्रह्मदोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।

योगी नुसता देहाने पावन झालेला नसावा तर तो मनाचा पावन हवा. विश्व पेटले तर हा योगी पावन होतो. यासाठी जनांचे क्लेश सहन करावे. शेवटी विश्व हे वस्त्र आहे हे वस्त्र ब्रह्माच्या दोऱ्याने विणले आहे. आपण ब्रह्मदोरा आहोत. संत कोणाला म्हणतात. ज्याच्या अंगी दया, क्षमा आहेत तो संत! ज्याला अहंता नाही तो विरक्त ।

शुद्ध ज्ञान ज्याच्या मुखात असते तो सुखी. आपण साधु झालो म्हणून इतरांना हीन लेखू नये. या विश्वाचा कारभार करणारे एक ब्रह्मसूत्र आहे. ते शक्तिमय आहे. ते विश्वमनाच्या रूपाने विश्व चालवते.

विश्वमताच्या मूलद्रव्याला ईश्वरी संकल्प म्हणतात. मानवी मनाच्या मूलद्रव्याला वासना म्हणतात. माणसाच्या साऱ्या कर्मप्रेरणा वासनेतून उगम पावतात. हेच मानवी मन ईश्वरी मनाशी संयुक्त झाले की वासना ईश्वरी संकल्पात विलीन होतात. असे निर्वासन मनच आदि–अंती माणसाला सुखी करते. यासाठी चिंता क्रोध मागे सारावे लागतात मग त्याला दिव्य शांती लाभते. ताटीचे एकूण ११ अभंग आहेत. क्षेपक २ आहेत. दिव्य शांती लाभली की वासना शांत होते. विश्वमनाशी समरसता येते. समदृष्टी होते. हीच देवत्वाची खूण आहे. याला शुद्ध भाव लागतो. प्रत्येक भाव सकाम असतो पण तो निष्काम झाला की शुद्ध होतो. त्यालाच 'ब्रह्मभाव' म्हणतात. सर्व खलुविदं ब्रह्म ही जाणीव झाल्यावर कोणी कोणावर रागवायचे. आपले आपल्यात्व तपासावे आणि विशुद्ध भावनेने जगापुढे पाहावे. भावनेच्या विकासातून महाशक्ती त्याच्या ठायी येते. ही भावास्थिरवृत्ती सद्गुरूनाथाच्या कृपेने अखंड टिकते. तिथेच बाप रखुमादेवीवराचा अखंड वास असतो. त्यातले सार फक्त घ्यायचे. तुम्ही या साऱ्यांतून तरून जा आणि विश्वालाही तारा! केवढा हा मुक्ताईचा अधिकार आहे! तो ज्ञानदेवांनी मानला. ज्ञानदेव हसत हसत उठले आणि त्यांनी ताटीचे दार उघडले. मुक्ताईला नमस्कार केला आणि कवेत घेतले आणि म्हणाले, ''आमच्यापेक्षाही मोठी झालीस!'' मुक्ताई म्हणाली, ''चुकभूल द्यावी घ्यावी. तुझ्या हातून मोठ कार्य व्हाययचं! तू तर आता रागावला म्हणून या ताटीन रहज बोलायला लावले. मुक्ताईचे हे चिंतन अगदी स्वतंत्र आहे. संत अखंड चिंतन करता असतात. मुक्ताई तर आई! नित्ययुक्त ब्रह्मवादिनी! त्यामुळे तिच्या दृष्टीला वेगळेच तेज प्राप्त झाले आहे.

मुक्ताईने हरिपाठही लिहिला आहे. त्यात फक्त १६ अभंग आहेत. हरिपाठ म्हणजे संतचरित्र लहानसा अभंग संग्रह. हरिपाठ म्हणजे भगवन्नामाचा सुटसुटीत सर्वांना समजणारा. सोपा पण गहन अभंग संग्रह. रोज म्हणायचा परिपाठ म्हणजे हरिपाठ! ज्ञानदेवांच हरिपाठ वारकरी मंडळीत सर्वप्रिय आहेच. भगवंताच्या नामाचे अनुसंधान कसे ठेवायचे आणि त्या अनुसंधानाचे पर्यवसन भगवंताच्या दर्शनात कसे घडून येते याचा आलेख हरिपाठात असतो. हरिपाठात नामाचा अभ्यास असतो. तो रोज करण्यासाठी हरिपाठ म्हणायचा असतो.

मुक्ताईच्या हरिपाठाचे वैशिष्ट्य असे की, तिने जीवाच्या मुक्ततेचा विचार केला. जीवाची मुक्तता म्हणजे जीवाची विकार रहित अवस्था! म्हणजेच इंद्रिय ताब्यात ठेवणे. प्रत्येक जीवात ईश्वर आहे. तो सर्वांच्या हृदयात आहे. तोच सर्वांचा आत्मा आहे. त्याचे हृदयस्थ जनार्दनाचे दर्शन भक्तालाच होऊ शकते. पण त्यासाठी त्याने भगवंताची भक्ती सातत्याने करावी लागते. भक्ती म्हणजे भगवंताचा निस्सीम प्रेम हवे. ह्या प्रेमात स्वार्थ नसतो. आपलेपणा असता. या मधुर आपुलकीने माणसाचा मी पणा नाहीसा होतो आणि त्याला स्वत:मध्येच देवाचे दर्शन घडते.

असा दर्शनाचा सर्वांगसुंदर मार्ग हरिपाठात सांगितला आहे. मुक्ताईचा हरिपाठ दिसायला वरवर सोपा. पण तो तसा नाही. नामात तल्लीन व्हायचे आणि भगवंताला भेटायचे व भगवंतात विरून जाणे. हा मुक्ताईच्या हरिपाठाचा केंद्रबिंदू आहे. यात नामामृताची गोडी आहे. श्रीगुरूंची संतसंगती आहे. मुक्ताईचा हा हरिपाठ साधकांना मार्गदर्शक आहेत.

असाच एक प्रसंग – ज्ञानदेवादीकांची असं आयुष्य चाललेलं होतं. कोरांत मागणे आणि त्यावरच जठराग्नी शांत करणे; ते कधी शिजवलेलं अन्न मागत नव्हते. त्यांच्या आयुष्यात त्यांना कधी गोड धोड अन्न माहीतच नव्हते. एकदा संक्रातीचा सण होता. एका भाविकाने गुळ–हरबऱ्याची डाळ, कणीक, तूप, तेल सर्वच दिले. निवृत्तिनाथांच्या मनात विचार आला याचे मांडे करावेत. ते मुक्ताईला म्हणाले, ''मुक्ताई तुला मांडे येतात कां ग?' मुक्ताई म्हणाली, ''हो येतात की.'' निवृत्तिनाथ म्हणाले, ''होय! मला यावेळी मांडेच खावेसे वाटतात. अरे कशाचीही अपेक्षा नसणारे निवृत्तिनाथ त्यांना मांडे खायचेत? मुक्ताईला खूप आनंद झाला. पण मांडे तव्यावर करत नाहीत त्यासाठी मातीच्या माठाच्या बुडाच्या आकाराचे खापराचे रांधणेच लागते. म्हणून मुक्ताई धावत धावत कुंभाराकडे गेली आणि म्हणाली, ''दादा आमच्या भावाला मांडे खावेसे वाटतात. तर रांधणे देता का हे

एक?'' मुक्ताईची मवाळ भाषा ऐकून आदर निर्माण झाला आणि त्याने एक सुंदर रांधणे काढून दिले.

आळंदीत एक श्रीमंत कर्मठ विसोबा नावाचा चाटी रहात होता. मुक्ताबाई रांधणे घरी आणत असताना त्याची व मुक्ताबाईंची रस्त्यात गाठ पडली. त्याने विचारले, ''काय ग काय आहे हे?' 'रांधणे आहे बाबा,' मुक्ताई उद्गारली. 'कशासाठी नेतेस?' मुक्ताई म्हणाली, ''दादांना मांडे खावेसे वाटतात.''

विसोबा चाटी विठ्ठलपंतापासूनच द्वेष करत असे. संन्यासाची पोरगी पाहून त्याला अजुनच द्वेष उत्पन्न झाला आणि तो उपरोधिकपणे बोलू लागला. 'का ग? साधू म्हणवता ना तुम्ही? तुमच्या तोंडाला कशाला असा चटका पाहिजे. रूसलेल्या ज्ञानदेवांना तूच समजावलेस ना? मोठी शहाणीच दिसतेस? थांब तुझे खापरच फोडून टाकतो बघू कसे मांडे खाता ते!' तो कुंभार कसा देतो ते पहातोच म्हणून मुक्ताईच्या हातातले खापर हिसकावून घेतले आणि फोडले. मुक्ताई पहातच राहिली. परत कुंभाराच्या घराकडे पळाली तर विसोबाने धावत जाऊन कुंभारवाड्यात सर्व कुंभारांना बजावले, ''या पोरीला रांधणे कुणी दिले तर खबरदार! तुमच्यावर माझे देणे आहे ते मी आत्ताच मागून घेईन!'' मुक्ताई रिकाम्या हाताने रडतच घरी आली. ज्ञानदेवांना सारं सांगितले. त्यावर ते म्हणाले, 'मांड्यांची सारी तयारी कर. खापराऐवजी माझ्या पाठीवर मांडे टाक.' 'दादा अरे त्याला अग्नी लागतो? पाठीवर मांडे कसे भाजतील?' 'अगं तू भाजून तर पहा.' झाले मुक्ताईने ज्ञानदेवांच्या पाठीवर मांडे भाजले. मांडा पाठीवर टाकला की तो फुगुन वर येत असे. हे सारे विसोबाचाटी खिडकीतून पहात होता. मांडे तयार झाल्यावर ही सर्व भावंडे जेवावयास बसली. त्या मांड्यांची चव अमृतासारखी लागत होती. त्याक्षणी विसोबांची खात्री पटली की ही भावंडे कोणी साधीसुधी नाहीत तर महान संत आहेत.

तो धावत झोपडीत शिरला आणि त्यांच्या पानातील उष्टे अन्न हा महाप्रसाद आहे. हा उच्छीष्ट प्रसादच घेऊनच आपला उद्धार होईल हे त्यांनी पूर्ण ओळखले आणि पत्रावळीवरील अन्न अधाशासारखे खाल्ले. तेव्हा 'विसोबा! तू पानातले उष्टे खातोस? तर तू खेचर (भूत) आहेस का?' मुक्ताई त्याला परता सर असे म्हणाली. **(पुढील अंकात)**


# वाढदिवस शुभचिंतन

**(०६ डिसेंबर)**

**श्री. उदयकुमार मुंगी**

## जाहिरात दरपत्रक

| प्रकार | आकार | दरमहा | वार्षिक |
|---|---|---|---|
| रंगीत | पूर्णपान १९x२५ सेमी | ५०००.०० | ५००००.०० |
| | अर्धपान १९x१२ सेमी | २५००.०० | २५०००.०० |
| | पावपान ९x१४ सेमी | १५००.०० | १५०००.०० |
| कृष्णधवल | पूर्णपान १९x२५ सेमी | २५००.०० | २५०००.०० |
| | अर्धपान १९x१२ सेमी | १५००.०० | १५०००.०० |
| | पावपान ९x१४ सेमी | १०००.०० | १००००.०० |
| शुभेच्छा | पावपान १९x२ सेमी | ५००.०० (कृष्णधवल) | |

## सूचना

जाहिरातीचे आर्टवर्क 'सीडीआर' किंवा 'पीडीएफ' फॉर्मेटमध्ये संस्थेचा मेल आयडी sanmargmitra2018 @gmail.com वर पाठविणे किंवा समक्ष संस्थेच्या कार्यालयात आणून देणे.

# विघ्नहर्ता वधु-वर सहायक मंडळ



संस्थेच्या वतीने सर्वसमावेशक अशी विघ्नहर्ता विवाह मंडळ या नावाने एक अतिशय उत्कृष्ट अशी वेबसाईट तयार करण्यात आली आहे. या वेबसाईटच्या सहाय्याने कोणत्याही जाती-धर्माचे लोक अनुरूप असे वधु-वर संशोधन करू शकतील. या वेबसाईटचे वैशिष्ट्य असे आहे की, आपण अगदी मोबाईलवरसुद्धा या वेबसाईटचा वापर करू शकता. या वेबसाईटवर आपले नाव नोंदणी करण्यासाठी आवश्यक असणारी फीसुद्धा आपण मोबाईलच्या माध्यमातून भरू शकता. अशा सर्व सोयीनी युक्त अशा मराठी व इंग्रजी भाषेची सोय असलेली ही वेबसाईट प्रत्येकासाठी उपयोगी ठरणार आहे. ज्यांची नोंदणी करावयाची असेल त्याचे **आधारकार्ड** या ठिकाणी आपणास पाहावयास मिळेल. म्हणजेच या वेबसाईटवर नोंदणी झालेल्या इच्छुकांची माहिती आपल्याला तपासून पाहाणे सोयीचे होईल. अशी सोय असलेली ही पहिलीच वेबसाईट असावी. सर्व सभासद तसेच सर्व जाती-धर्माच्या नागरिकांना आवाहन करण्यात येते की, प्रत्येकाने या वेबसाईटला भेट द्यावी व आपल्याला आवश्यक ती माहिती भरून वधु-वर संशोधन करावे ही नम्र विनंती.

वेबसाईट **www.abms.vignhartamatrimoni.com**

या वेबसाईटला भेट दिल्यानंतर आपल्याला ही वेबसाईट वापरण्यास किती सोपी व स्वस्त आहे ते समजेल.
प्रत्येकाने एकवेळ या वेबसाईटला अवश्य भेट द्यावी ही विनंती.

***अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था व समाज सहाय्यक संस्था, नाशिक संचलित***

**विघ्नहर्ता वधु-वर सहाय्यक मंडळ : vighnahartamatrimony.com**

ही वेबसाईट सर्व जाती-धर्मियांच्या वधु-वरांकरिता सुरू करण्यात आली असून इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा,
असे आवाहन संस्थेमार्फत करण्यात येत आहे.

## ऑफलाईन नाव नोंदणीसाठी संपर्क


नाशिक : ०२५३-२३१३५९९
नाशिक (पंचवटी) : ७९७२२४२१६५
पुणे : ०२०-२४४३६९२२
जुन्नर : ९९७५६०३७७६
फलटण : ९८६०७२८६९८/९४२१८८१५६३
निरा (पुरंदर) : ९८२३३२६६८४

## वेबसाईटवर नोंदणी फक्त ऑनलाईनच करता येणार असून त्याचे दर खालीलप्रमाणे

- ३ महिन्यांकरिता : १०००/-
- ६ महिन्यांकरिता : २०००/-
- १ वर्षासाठी : ३०००/-
- १ वर्षानंतर नूतनीकरणास : १०००/-



## 'सन्मार्ग मित्र' लेखन पाठविण्याकरिता सूचना



१. राजकिय विषय सोडून कोणत्याही प्रकारचे लिखाण पाठवावे.
२. लिखाण कागदाच्या एका बाजूस सुवाच्च अक्षरात लिहिलेले अथवा टाईप केलेले असावे.
३. ब्राह्मण समाजातील विविध संस्था कार्यरत आहेत. त्यांनी आपआपल्या संस्थांच्या कार्यक्रमाचे वृत्तांत मुद्देसुद पाठविल्यास त्या लिखाणाला प्राधान्य देण्यात येईल.
४. प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंयत लिखाण संस्थेच्या कार्यालयात पोहोचेल या बेताने ते पाठवावे.
५. मासिकाच्या ध्येय धोरणाला अनुसरुन लिखाणामध्ये आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार संपादकांनी राखून ठेवला आहे.
६. लिखाण स्वीकृत अगर अस्वीकृत करणे संपादकांच्या अधिकारात राहिल. अग्राह्य लिखाणास कारण देण्याचे बंधन संपादकांवर नाही. तसेच लिखाणास कोणतेही मानधन दिले जाणार नाही.
७. मासिकात व्यक्त होणाऱ्या मतांशी संस्था किंवा संपादक सहमत असतीलच असे नाही.

## विनम्र आवाहन

१. संस्थेच्या सर्व सभासदांनी आपला बदललेला अथवा नवीन पत्ता, फोन नंबर, मेल आयडी इत्यादी संस्था कार्यालयात येऊन अथवा पत्राद्वारे अपडेट करावा ही विनंती.
२. ब्राह्मण समाजातील सर्व जाती, पोट जातीच्या समाजबांधवांनी अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचे सभासद व्हावे ही नम्र विनंती. (आजीव सभासद वर्गणी रु. ५०१/– मात्र) सभासदत्वाचा अर्ज संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध असून आपले ओळखपत्र, निवासाचा पत्ता व एक फोटोसह विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयात भरून द्यावा.

## संस्थेची केंद्र कार्यालये

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक केंद्र
केंद्र प्रमुख : श्री. महेश शुक्ल, मो. : ९८८११२४१४४
जलशुद्धीकरण केंद्राशेजारी, हॉटेल सिबल जवळ, त्र्यंबकरोड, नाशिक – ४२२ ००२. फोन : २५७२३२६

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पंचवटी, नाशिक
केंद्र प्रमुख : श्री. प्रदिप भानुवंशे मो. : ७९७२२४२१६५
घर नं. ४४७७, भानुवंशे वाडा, भोंडे गल्ली, कपालेश्वर मंदिरामागे, पंचवटी, नाशिक – ४२२ ००३

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पुणे केंद्र
प्रभारी केंद्र प्रमुख : ॲड. गणेश गोखले
'कौशिक', १२९३, सदाशिव पेठ, पुणे –३०.
फो : ०२०–२४४३६९२२

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, जुन्नर केंद्र
केंद्र प्रमुख : श्री. रामचंद्र वैद्य
मो. : ९९७५६०३७७६
बेलवलकर सभागृह, बुधवार पेठ, जुन्नर, जि. पुणे

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नीरा केंद्र
केंद्र प्रमुख : श्री. दत्तात्रय त्रिंबक बडबडे. मो. : ९८२३३२६६८४
समर्थ बंगला, बाजार तळ, मराठी शाळे मागे, नीरा, ता. पुरंदर जि. पुणे

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, फलटण केंद्र
केंद्र प्रमुख : श्री. भालचंद्र दत्तात्रय ताथवडकर.
मो. : ९८६०७२८६९८.
११८, कसबा पेठ, फलटण, जि. सातारा

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, शिरवळ केंद्र
केंद्र प्रमुख : ॲड. अमृत बाळकृष्ण मोने. मो. : ९८६०५ ४०९८६ । शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा.